संग्राम: तीन चित्रपटांची प्रेरणा

शक्ती, फर्ज और कानून, दिल और मोहब्बत ज्या चित्रपटाचे रिमेक म्हणावे लागतील त्या संग्रामबद्दल अनेक विवादास्पद घटना घडल्या.

☐ इसाक मुजावर



अशोककुमारच्या हाती रिव्हॉल्वर पाहून मोरारजी देसाई अस्वस्थ झाले होते.



*संग्राम*प्रमाणेच *दिल और मोहब्बत*मध्येही नायिकेने बेदिंग सूट परिधान केला होता.

हिंदी चित्रपटातील पिस्तुलधारी नायक आज कोणालाही खटकत नाही. १९८२चा दिलीपकुमार-अमिताभ बच्चन यांची भूमिका असलेला रमेश सिप्पी दिग्दर्शित मुशीर आणि रियाज यांचा *शक्ती* चित्रपटात अमिताभ गुन्हेगार असतो. पोलिसांनी घातलेला गराडा तोडण्यासाठी तो पोलिसांवर गोळीबार करून निसटतो असं दृश्य होतं.

शक्ती १९५०च्या अशोककुमार-नलिनी जयवंत अभिनित, ग्यान मुखर्जी दिग्दर्शित बॉम्बे टॉकीजच्या *संग्राम*चा रिमेक होता. अशोककुमार त्याचा नायक होता. पण *शक्ती* पडद्यावर आला तेव्हा काळ बदलला होता. *संग्राम*चा पिस्तुल चालवणारा नायक सेन्सॉरला खटकला होता. हा नायक समाजातील अपप्रवृत्तींचं उदात्तीकरण करणारा आहे, असा आक्षेप घेऊन सेन्सॉरने 'ए' प्रमाणपत्र देऊन हा चित्रपट फक्त प्रौढांसाठी संमत केला होता. *शक्ती* 'यू' प्रमाणपत्र घेऊन पडद्यावर आला तरी या चित्रपटाविरुद्ध कोणताही वाद निर्माण झाला नव्हता. पण *संग्राम* 'ए' प्रमाणपत्र घेऊन पडद्यावर आल्यावरदेखील वादग्रस्त चित्रपट ठरला. *शक्ती*च्या क्लायमॅक्समध्ये पोलिसांवर बेदरकारपणे गोळ्या चालवणारा अमिताभ हिरो ठरला. तरी *संग्राम*मधला पोलिसांवर शांतपणे गोळ्या चालवणारा अशोककुमारचा नायक मात्र प्रेक्षक त्याच शांतपणे पाहायचे नाहीत. या गोळीबारात पोलीस खाली पडलेला पाहून प्रेक्षक शिट्या फुंकून नायकाचा जयजयकार करायचे. हे पाहून पोलीस या चित्रपटाविरुद्ध खवळले होते आणि तेव्हाचे मुंबई राज्याचे गृहमंत्री मोरारजी देसाई यांना भेटून या चित्रपटावर बंदी घालायची मागणी त्यांनी केली. त्यांच्या या मागणीचा मोरारजीभाईंनीदेखील गंभीरपणे विचार केला. अशोककुमारला ही गोष्ट कळली तेव्हा तो त्यांना भेटायला गेला आणि *संग्राम*वर बंदी आणू नका, अशी विनंती त्यांना केली. त्यावेळी अशोककुमारला त्यांनी बजावलं, 'यापुढे कोणत्याही भूमिकेत हाती पिस्तुल घ्यायचं असेल तर ते पोलीस बनून घ्या. चोर बनून नको. कारण लोक तुम्हाला आपला आदर्श मानून तुमचं अनुकरण करतात.'

अशोककुमारने मोरारजीभाईंची ही मागणी खऱ्या अर्थाने मान्य केली नाही. *शेरू, वॉरंट, उस्ताद, उस्तादों के उस्ताद, ज्वेल थीफ, व्हिक्टोरिया नं. २०३, चोरी मेरा काम* यासारख्या अनेक चित्रपटात चोराची भूमिका करत तो आपल्या चित्रपटात पिस्तुल चालवतच राहिला. नलिनी जयवंत या चित्रपटात त्याची नायिका होती. १९५० साली *समाधीत* ती सर्वात प्रथम अशोककुमारची नायिका बनली. त्यानंतर १९५०लाच पुन्हा *संग्राम*बरोबरच नलिनी जयवंतचा आणखीन एक चित्रपट आला होता *मुकद्दर*. सज्जन या चित्रपटात तिचा नायक होता आणि *संग्राम*मध्ये तो तिचा बाप बनला होता. या दोन्ही चित्रपटांचं चित्रण एकाच वेळी सुरू होतं. यामुळे एक दिवशी सज्जनची मुलगी तर दुसऱ्या


दिवशी त्याची प्रेयसी म्हणून तिला सेटवर वावरावं लागायचं. शशी कपूरने या चित्रपटात छोट्या अशोककुमारची भूमिका साकारली तर बेबी तबस्सुमने छोट्या नलिनी जयवंतची.

सी. रामचंद्र या चित्रपटाचे संगीतकार होते. यात एकूण सात गाणी होती. त्यापैकी 'कस के कमर हो जा तैयार...'(लता-शमशाद), 'वो उनका मुस्कुराना शरमाना चले जाना...'(अरुणकुमार), 'देखो देखो ये गडबड घोटाला, दाल मे है कुछ काला...'(सी. रामचंद्र-शमशाद), 'उल्फत के जादू का दिल मे असर है...'(लता-सी. रामचंद्र) ही पाच गाणी वैजेंद्र गौडनी लिहिली होती. लताने यातील 'नजर से नजर जो मिलाई गई है...' व 'दिल दिया है आपने तो मेहरबानी आपकी...' ही दोन गाणी कोरसबरोबर गायली होती. पहिलं गाणं संतोषीनी लिहिलं होतं. दुसरं गाणं राजा मेहेंदी अली खाननी. हे गाणं हेमावतीवर चित्रित करण्यात आलं होतं. आपल्या चित्रपटात क्लब साँगची सुरुवात करणारं हे पहिलं गाणं. 'उल्फत के जादू का दिल मे असर है...' या गाण्यात नलिनी जयवंत अशोककुमारबरोबर बेदिंग सूट परिधान करून पडद्यावर आली होती. बेदिंग सूट परिधान करणारी हिंदी चित्रपटातील पहिली नायिका मीनाक्षी(आजच्या शिल्पा आणि नम्रता शिरोडकर यांची आजी) होती. १९३८च्या *ब्रम्हचारी*त तिच्या बेदिंग सूटने चांगलीच खळबळ माजवली होती. *संग्राम*मधल्या नलिनी जयवंतच्या बेदिंग सूटने पुन्हा खळबळ माजवली. कारण यात तिने बेदिंग सूटमध्ये दिलेल्या पोझीस चित्रपटाच्या पोस्टरवर ठळकपणे झळकल्या.

*संग्राम*च्या वेळी गुरुदत्त आणि शक्ती सामंता ग्यान मुखर्जींचे साहाय्यक होते. *किस्मत* व *संग्राम*पासून त्यांनी गुन्हेगारी पार्श्वभूमीवरील चित्रपटांची एक वेगळी परंपरा येथे निर्माण केली होती. त्या परंपरेचा धागा गुरुदत्तनी *बाजी* या आपल्या पहिल्या चित्रपटात पकडला. शक्ती सामंत दिग्दर्शित पहिला चित्रपट *बहू*ला विशेष यश मिळालं नाही. यामुळे *इन्स्पेक्टर*या आपल्या दुसऱ्या चित्रपटात ग्यान मुखर्जींच्या गुन्हेगारी पार्श्वभूमीवरील चित्रपटांची कास त्यांनी पकडली. या चित्रपटानेच त्यांना यशस्वी दिग्दर्शक बनवलं.

*संग्राम*नंतर पिस्तुलधारी नायक आपल्या चित्रपटात लोकप्रिय होऊ लागला. १९६८चा जॉय मुखर्जी व शर्मिला टागोर अभिनित व आनंद दत्ता दिग्दर्शित *दिल और मोहब्बत*ही *संग्राम*चा रिमेक होता. *संग्राम*मध्ये नलिनी जयवंत बेदिंग सूटने विवाद निर्माण केले पण या रिमेकमध्ये शर्मिला टागोर बिकिनी परिधान करून पडद्यावर आली होती. या चित्रपटाच्या वेळी अशोककुमार नायकाचा चरित्र-अभिनेता बनला होता आणि *संग्राम*च्या नायकाने त्याच्याच रिमेकमध्ये नायकाच्या पित्याची भूमिका साकारली होती हा आणखी एक योगायोग! हा चित्रपट फारसा चालला नाही. पण नंतरच्या *शक्ती*ने मात्र चांगलं यश पाहिलं. या चित्रपटात अमिताभ नायक होता तर नायिकेची भूमिका स्मिता पाटीलने साकारली. *संग्राम* आणि *दिल और मोहब्बत*मध्ये नायकाची आई ही व्यक्तिरेखाच नव्हती. *शक्ती*मध्ये नायकाच्या आईची व्यक्तिरेखा निर्माण केली गेली ती राखीने साकारली होती. या भूमिकेद्वाराच ती सर्वात प्रथम पडद्यावर नायकाची आई बनली. *संग्राम* व *दिल और मोहब्बत*मध्ये नायकाला नसलेला मुलगा *शक्ती*त होता. मुलाची ही भूमिका करणाऱ्या अनिल कपूरचा हा पहिलाच चित्रपट. *शक्ती*त दिलीपकुमारच्या बॉसची एका सीनपुरती भूमिका होती ती अशोककुमारने साकारली होती. *संग्राम*च्या वेळी स्मगलिंगचं वारं आपल्या देशाला लागलेलं नव्हतं. पण *शक्ती*च्या काळात आपल्या देशात फोफावलेल्या स्मगलिंगच्या गुन्ह्याची पार्श्वभूमी घेण्यात आली होती.

१९८२ साली *शक्ती*बरोबरच *संग्राम*पासून प्रेरणा घेऊन तयार झालेला आणखी एक चित्रपट आला होता. के. राघवेंद्रराव दिग्दर्शित राजा पिक्चर्सच्या *फर्ज और कानून*मध्ये जितेंद्र, हेमामालिनी, रती अग्निहोत्री, राज किरण होते. यात जितेंद्रने डबल रोल केला हे त्याचं आणखी एक वैशिष्ट्य. *संग्राम*मध्ये नबाब काश्मिरी-अशोककुमार, *दिल और मोहब्बत*मध्ये अशोककुमार-जॉय मुखर्जी, *शक्ती*मध्ये दिलीपकुमार-अमिताभ पिता-पुत्र बनले होते. *फर्ज और कानून*मध्ये या दोन्ही भूमिका जितेंद्रने साकारल्या. दिलीपकुमार-अमिताभमुळे *शक्ती*ची जशी चर्चा झाली तशी *फर्ज और कानून*ची चर्चा झाली नव्हती. तरीही *शक्ती*हून हा चित्रपट अधिक चालला होता. ✰



*शक्ती*मध्ये अमिताभ - दिलीपकुमार



*फर्ज और कानून*मध्ये जितेंद्र - हेमा



*वर्मा रोड*मध्ये अशोककुमार - विजया: *संग्राम*नंतर चित्रपटात वारंवार पिस्तुल दिसू लागलं